महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

गुरुवार ■ ०७ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०४७ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी घेतली अमित शहांची भेट

## एकाच आठवड्यात दोनदा दिल्ली दौरा ■ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि खासदारांच्या प्रश्नांवर स्कारात्मक चर्चा

**राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एकाच आठवड्यात दोन वेळा दिल्ली दौरा केला. त्यांच्या दिल्ली दौऱ्यामुळे राज्यातील महायुती सरकारमध्ये आलबेल नसल्याची चर्चा सुरू झाली. दिल्ली दौऱ्यात एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. या दोन्ही नेत्यांमध्ये अर्धा तास चर्चा झाली. दरम्यान शिंदे आणि शहा यांच्यात नेमकी काय चर्चा झाली याबाबत आता वेगवेगळे तर्क काढले जात आहेत.**



दै. ठाणे जीवनदीप वार्ता


दिल्लीत संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू असताना राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आलेला दिसून येत आहे. एका बाजूला शिवसेनेचे (ठाकरे) प्रमुख उद्धव ठाकरे यांचा नियोजित दौरा सुरू असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेही दिल्लीत पोहोचले. आधी त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची खासदारांच्या शिष्टमंडळासह भेट घेतली. त्यानंतर ते सहकुटुंब पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटले. पंतप्रधान मोदींशी त्यांनी अर्धा तास संवाद साधल्याची माहिती मिळत आहे. अमित शाहांबरोबर बैठक झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी यापुढेही महायुती म्हणूनच निवडणुकांना सामोरे जावू, असे विधान केले. पंतप्रधान मोदींच्या भेटीनंतर एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका मांडली आहे. पहलगाम हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला जशास तसे उत्तर दिल्याबाबत आपण पंतप्रधान मोदींना शुभेच्छा देण्यासाठी भेटलो होतो, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. ते म्हणाले, "आजवर पाकिस्तान आणि दहशतवाद्यांनी अनेक हल्ले केले, परंतु यावेळी जशास तसे उत्तर देण्याचे धाडस पंतप्रधान मोदींनी दाखवले. तसेच जगभरात शिष्टमंडळ पाठवून पाकिस्तानचा खरा चेहरा उघड केला. त्यामुळे त्यांचे अभिनंदन करत आणि शुभेच्छा दिल्या." दरम्यान, राज्याच्या राजकीय वर्तुळात एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यातील अधिकारांवरून संघर्ष पेटला असल्याची चर्चा सुरूय. शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत झालेल्या चर्चेदरम्यान काय घडलं? कोणत्या मुद्द्यांवर चर्चा झाली याची सविस्तर माहिती पत्रकारांशी बोलताना दिली. अमित शाह यांच्याशी झालेल्या भेटीबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की "अधिवेशन सुरू असताना मी दिल्लीत येत असतो. आमचे खासदारही गृहमंत्र्यांना भेटले आहेत. त्यांच्या मतदारसंघांशी संबंधित काही मुद्द्यांवर चर्चा झाली. त्यांचे काही प्रश्न समस्या होत्या, त्या अमित शहायांच्यासमोर मांडल्या. मागच्या आठवड्यात दिल्ली दौरा केला होता, त्यावेळी मी त्यांना भेटलो नव्हतो. त्यामुळे मी आता भेटलो. ही सदिच्छा भेटही झाली आणि खासदारांच्या समस्या होत्या बाबतही चर्चा झाल्याची माहिती पत्रकारांशी बोलताना दिली.

### महायुतीत काहीच धुसफूस नाही - शिंदे

विधानसभा निवडणुकीत शिवसेना (शिंदे) पक्षाने मविआच्या ज्या उमेदवारांचा पराभव केला, त्या उमेदवारांना भाजपा पक्षप्रवेश देत असून त्यांना ताकद देत आहे. यावरून महायुतीत आलबेल नाही, असा आरोप होत असल्याबाबतचाही प्रश्न शिंदे यांना विचारण्यात आला होता. यावर बोलताना शिंदे म्हणाले, आम्ही महायुतीची ताकद वाढविण्याचा प्रयत्न करत आहोत. आमच्यात कोणतीही धुसफूस नाही.

### उपमुख्यमंत्री शिंदेंकडून पंतप्रधानांना महादेवाची तसबीर भेट

**महादेव अर्थात शंकराने वाईट प्रवृत्ती नष्ट करुन विजय मिळवला. तशाच प्रकारे लष्कराने ऑपरेशन सिंदूर आणि ऑपरेशन महादेवच्या माध्यमातून दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. या मोहीमांच्या यशाचे प्रतीक म्हणून आज उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना महादेवाची तसबीर भेट दिली. ऑपरेशन सिंदूर आणि ऑपरेशन महादेववर काँग्रेस आणि इंडि आघाडीने संशय घेतला होता, मात्र ऑपरेशन महादेव यशस्वी झाले आणि दहशतवाद्यांना ठार करण्याची तमाम भारतीयांची इच्छा पूर्ण झाली म्हणून पंतप्रधानांना महादेवाची तसबीर देण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.**




## माजी आमदार नरेंद्र पवारांचे उपोषण स्थगित



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. ६ (वार्ताहर) :** कोकण वसाहतीतील शांतीदूत सोसायटीच्या रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पासंदर्भात भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी रहिवाशांसह सुरू केलेले बेमुदत उपोषण मंगळवारी (ता. ५) तिसऱ्या दिवशी तूर्तास स्थगित करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लवकरच बैठक घेऊन प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिल्याने हे उपोषण मागे घेण्यात आले आहे. यासंदर्भात भाजप आमदार किसन कथोरे आणि महेश चौगुले यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी चर्चा करून त्यांना सविस्तर माहिती दिली. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी लवकरात लवकर बैठक घेण्याचे आश्वासन दिले. ही माहिती पवार यांना देण्यात आली असून भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनाही याची कल्पना देण्यात आली आहे. मुख्यमंत्री आणि प्रदेशाध्यक्षांच्या बैठकीत आम्हाला समाधान न मिळाल्यास पुन्हा उपोषण सुरू करू; मात्र मुख्यमंत्री प्रश्न सोडवतील, यावर आमचा विश्वास आहे, असे नरेंद्र पवार यांनी स्पष्ट केले.

## मजीप्राच्या ढिसाळ कारभाराचा बदलापूरकरांना फटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**बदलापूर :** दरवर्षीच्या तुलनेत यंदा मान्सून वेळेअगोदर दाखल झाल्याने पाणीटंचाईचा सामना बदलापूरकरांना करावा लागणार नाही, असे वाटले होते. मात्र यावर्षी तर ऐन पावसाळ्यात 'पाण्याचीही आठवडा सुट्टी' होणार आहे, असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पत्रक काढून जाहीर केले आहे.

बदलापूर शहरात महावितरणाचा वेळीअवेळी होणाऱ्या विजेच्या लपंडावाचा फटका शहरातील पाणी व्यवस्थेलाही बसला आहे. बदलापूर आणि अंबरनाथ पाणीपुरवठा योजना १०० वर्षे जुनी असून अजूनही ती कार्यरत आहे. त्यातच शहरात महानगर गॅस, एमआयडीसी, सिग्नल यंत्रणा, सीसीटीव्ही, महावितरणचे आणि इतर कामांसाठी रस्ता खोदताना पाणीपुरवठ्याच्या पाइपलाइन कधी कधी फुटत असतात, त्यामुळे कुठे तरी पाणी गळती होतच असते. तसेच गेल्या वर्षभरात १००० नवीन पाण्याचे कनेक्शन देण्यात आले आहेत.

तसेच अजून ५०० नवीन कनेक्शन प्रस्तावित आहेत. त्यासाठी जवळजवळ २.५ द.ल.लि. पाणी अतिरिक्त लागत आहे. तसेच नवीन योजना अजून सुरू झालेली नाही. यावर्षी मे महिन्यापासून अवकाळी पाऊस पडल्याने बडोदा एक्सप्रेस मार्गाची माती पहिल्याच पावसात पाइपमध्ये जाऊन कार्यक्षमता कमी झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे रोज २०% पर्यंत पाणीपुरवठा कमी होत असल्याने टाक्यांची क्षमता ठरलेल्या वेळेत पूर्ण होत नाही. परिणामी, वेळेच्या नियोजनामुळे कमी दाबात पाणी सोडण्यात येते. पावसामुळे पाण्याच्या गढूळतेचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे दिवसातून किमान ३ ते ४ वेळा ट्रिपिंग होत असल्याने पंपिंग बंद होऊन याचा पाणीपुरवठ्यावर परिणाम होत आहे.



## मुख्यमंत्री सहाय्यता निधीवर देखरेख शक्य नाही

### मुंबई हायकोर्टाने याचिका फेटाळली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा वापर अन्य कारणासाठी केला जात असल्याचा दावा करणाऱ्या याचिकाकर्त्यांना दिलासा देण्यास मुंबई उच्च न्यायालयाने नकार दिला. मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने मुख्यमंत्री सहाय्यता निधी वितरणावर न्यायालय लक्ष ठेवू शकत नाही, परंतु ज्या उद्देशासाठी हा निधी वापरला जात आहे, त्याचा गैरवापर होणार नाही, निधी वाटपात कोणतेही विचलन होणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त करत याचिका फेटाळून लावली.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी ज्या कारणासाठी स्थापन करण्यात आला होता, त्यापेक्षा वेगळ्या कारणांसाठी हा निधी वापरला जात असल्याचा दावा करत 'पब्लिक कन्सर्न फॉर गव्हर्नन्स ट्रस्ट' या स्वयंसेवी संस्थेने हायकोर्टात जनहित याचिका दाखल केली होती. या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

यावेळी याचिकाकर्त्यांच्यावतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या वापरालाच आक्षेप घेण्यात आला. या निधीचा वापर केवळ नैसर्गिक आपत्ती आणि दुर्घटनामधील पीडितांना मदत करण्यासाठी केला जावा, असा उद्देश होता. मात्र, नोव्हेंबर २००१ मध्ये ही उद्दिष्टे वाढविण्यात आली. नैसर्गिक आपत्तींव्यतिरिक्त इतर घटनांमधील पीडितांच्या वाढत्या मागण्या लक्षात घेऊन इतर पीडितांनाही हा निधी वितरित केला जातो. त्याचा गैरवापर होत असल्यामुळे मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे ऑडिट करण्यासाठी हायकोर्टाने समिती स्थापन करावी, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली.

यावेळी सरकारने याचिकेलाच जोरदार आक्षेप घेतला. मुख्यमंत्री मदत निधीची स्थापना नैसर्गिक आपत्ती आणि आपत्तींमधील पीडितांना मदत करण्यासाठी करण्यात आली होती, तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या उद्दिष्टांना मंजुरी देणे आणि त्यांचा विस्तार करणे, हा राज्य सरकारचा धोरणात्मक निर्णय आहे, याकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. याची दखल खंडपीठाने घेत सरकारच्या धोरणात्मक निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

## शहापूर तालुक्याला भावली धरणातून पाणी देण्यास विरोध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भरत उबाळे



**शहापूर, ता. ५ :** धरणांचा तालुका म्हणून ओळख असलेल्या शहापूर तालुक्याने दातृत्व भावना बाळगून मुंबई आणि उपनगरांची गेली अनेक वर्षे तहान भागवली आहे. परंतु, हाच दातृत्वभाव बाळगणाऱ्या शहापूर तालुक्याला पाणीटंचाईचे शुक्लकाष्ट सोसावे लागत आहे. आता नाशिकचे माजी खासदार हेमंत गोडसे यांनी भावली धरणावरील योजनेतून पाणीपुरवठा करण्यास विरोध केला आहे. आमदार हिरामण खोसकर यांच्यापाठोपाठ भावलीच्या वादात गोडसे यांनी थेट उडी घेतली आहे. यानिमित्ताने त्यांनी सोमवारी (ता. ४) इगतपुरी येथे भेट दिली.

इगतपुरी तालुक्याची जलवाहिनी असणाऱ्या भावली धरणासाठी तालुक्यातील भूसंपादनात अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आहेत. त्यामुळे तालुक्याच्या शेतकऱ्यांचा मोठा त्याग आहे. त्यांचे हक्काचे पाणी केवळ तालुकावासींनाच मिळावे. पाणी शहापूरला जावू देणार नाही, असा थेट इशाराच खासदार गोडसे यांनी दिला. दीड टीएमसी क्षमतेच्या भावली धरणातून शहापूर तालुक्याला पाणी देण्याबाबत सरकारचे धोरण आहे. या धोरणाला गोडसे यांनी विरोध केला आहे. नागपूरच्या अधिवेशनात त्यांनी विधानसभेत प्रश्न उपस्थित करत पाणी देण्यास हरकत घेतली होती. भावली धरणातून इगतपुरी नगरपालिका, घोटी ग्रामपालिकेसह अन्य १० ते १२ गावांना पिण्याचे पाणी दिले जाते. शिवाय, याच धरणातून मराठवाडा, अहिल्यानगरला आरक्षित पाणी सोडले जाते. एप्रिल व मे महिन्यातच धरण कोरडे पडते. या पार्श्वभूमीवर गोडसे यांनी शहापूरसाठी अन्य धरणातून पाणी उपलब्ध करण्याची मागणी केली आहे. तर दुसरीकडे भावलीतील पाणी देण्यास हरकत घेतली आहे.

शहापूरला अन्य धरणातून पाणी दिल्यास भावली धरण परिसरात असलेल्या भागातील जलस्रोतांचे संतुलन राखले जाऊन स्थानिकांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाईचा प्रश्नही निकाली निघेलण, असा युक्तिवादही त्यांनी केला आहे. दरम्यान, माजी खासदार हेमंत गोडसे व आमदार हिरामण खोसकर यांनी शहापूरला पाणी देण्यास विरोध केल्याने शहापूर तालुक्यातून संताप व्यक्त केला जात आहे.

## जिल्हा परिषद 'सीईओं'नी घेतला रानभाज्यांचा आस्वाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

प्रतिनिधी



**ठाणे** - ठाणे जिल्हा परिषदेच्या उमेद ग्रामीण जीवनोन्नती अभियाना' अंतर्गत औषधी आणि पोषणमूल्यांनी भरलेल्या रानभाज्यांचा अनोखा महोत्सव बीजे हायस्कूलच्या परिसरात भरविण्यात आला आहे. या महोत्सवाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या उपस्थितीत झाले, यावेळी त्यांनी विविध प्रकारच्या रानभाज्यांचा आस्वाद घेतला.

काही दिवसांपूर्वी आदिवासी पाड्यांतील समस्या जाणून घेण्यासाठी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी सुमारे १० किमी पायपीट करत भर पावसात शहापूर तालुक्यातील दापुरमाळ या आदिवासी पाड्याची पाहणी केल्याची चर्चा रंगली असतानाच, बीजे हायस्कूलच्या आवारात भरविण्यात आलेल्या रानभाज्या महोत्सवात घुगे यांनी रानभाज्यांचा आस्वाद घेतला.










## वनहक्क दाव्यांसाठी आदिवासींचा आंदोलनाचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूरः वनहक्क निवाड्यानंतर लाभार्थी कुटुंबांना तीन महिन्यांच्या आत त्यांच्या विहीत क्षेत्राचा नकाशा मिळणे अपेक्षित असते. मात्र ठाणे जिल्ह्यातील शेकडो आदिवासी कुटुंबांना १४ वर्षांनंतरही हे नकाशे मिळालेले नाहीत. प्रशासनाच्या या दिरंगाईचा निषेध म्हणून ११ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने श्रमिक मुक्ती संघटनेच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले जाणार आहे.

मुरबाड, शहापूर, कल्याण आणि अंबरनाथ तालुक्यातील वनहक्क धारकांना त्यांचे नकाशे तयार करून जिल्हास्तरीय वनहक्क समितीने प्रदान करणे अपेक्षित होते. मूळ अभिलेखात योग्य दुरुस्त्या करणेही आवश्यक होते. यासाठी आदिवासी विकास विभागाने जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षक, ठाणे यांना १.३२ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. तरीही अनेक विनंत्यांनंतरही वनहक्क धारकांना त्यांच्या क्षेत्राचे नकाशे मिळालेले नाहीत.

ऑगस्ट ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीत शेकडो आदिवासींनी उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालयात नकाशा मिळवण्यासाठी अर्ज सादर केले. प्रतिसाद न मिळाल्याने १३ डिसेंबर २०२३ रोजी संघटनेने कल्याण उपविभागीय कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले होते. त्यावेळी तीन महिन्यांत नकाशे देण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले. मात्र दीड वर्ष उलटूनही काहीच कार्यवाही झाली नाही. त्यामुळे आदिवासी बांधवांमध्ये संतापाचे वातावरण आहे. प्रशासनाच्या याच दिरंगाईच्या पार्श्वभूमीवर आता आदिवासी बांधवांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. येत्या ११ ऑगस्ट रोजी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आदिवासी आपल्या मागण्यांसाठी धरणे आंदोलन करणार आहेत.

# गीतासार

### अध्याय १८
### मोक्षसंन्यासयोगः

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये ।बन्धं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्त्विकी ॥ १८-३० ॥

हे पार्थ (अर्थात पृथापुत्र अर्जुना), जी बुद्धी प्रवृत्तिमार्ग व निवृत्तिमार्ग, कर्तव्य व अकर्तव्य, भय व अभय तसेच बंधन व मोक्ष यथार्थपणे जाणते, ती सात्त्विक बुद्धी होय. ॥ १८-३० ॥

यया धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेव च । अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी ॥ १८-३१ ॥

हे पार्थ (अर्थात पृथापुत्र अर्जुना), मनुष्य ज्या बुद्धीमुळे धर्म व अधर्म तसेच कर्तव्य व अकर्तव्य यथायोग्य रीतीने जाणत नाही, ती बुद्धी राजसी होय. ॥ १८-३१ ॥

अधर्मं धर्ममिति या मन्यसे तमसावृता । सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी ॥ १८-३२ ॥

हे पार्थ (अर्थात पृथापुत्र अर्जुना), तमोगुणाने व्यापलेली जी बुद्धी अधर्मालाही हा धर्म आहे असे मानते, तसेच याच रीतीने इतर सर्व पदार्थांनाही विपरीत मानते, ती बुद्धी तामसी होय. ॥ १८-३२ ॥

धृत्या यया धारयते मनःप्राणेन्द्रियक्रियाः । योगेनाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्त्विकी ॥ १८-३३ ॥

हे पार्थ (अर्थात पृथापुत्र अर्जुना), ज्या अव्यभिचारिणी धारणशक्तीने मनुष्य ध्यानयोगाने मन, प्राण व इंद्रिये यांच्या क्रिया धारण करीत असतो, ती धारणा सात्त्विक होय. ॥ १८-३३ ॥

# रांगोळीतून साकारली तिरंग्याची रुपे

## केडीएमसी शिक्षण विभागाचा उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण :युवा पिढीमध्ये / शालेय विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्र प्रेमाची भावना प्रज्वलित करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाच्या निर्देशानुसार घरोघरी तिरंगा या अभियाना अंतर्गत महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार शिक्षण विभागाचे उपायुक्त संजय जाधव, शिक्षण अधिकारी विजय सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण विभागामार्फत अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

या अनुषंगाने काल महापालिका क्षेत्रातील शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी आपला देश, आपला तिरंगा या बाबतची माहिती अधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीकोनातून प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले होते. शालेय विद्यार्थी व विद्यार्थीनींनी या प्रश्नमंजुषेत हिरिरीने सहभाग घेतला आणि शिक्षक वर्गाने सहभागी विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रश्नांची समाधन कारक उत्तरे दिली.



आज दिवसभरात शिक्षण विभागामार्फत तिरंगा रंगाच्या रंगावली स्पर्धेची आयोजन करण्यात आले होते. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अनेक चित्ताकर्षक रांगोळ्या साकारल्यामुळे शाळा- शांळामधील वातावरण देश प्रेमाने भारुन गेले होते.

# वाशी खारेपाटातील सर्व ग्रामपंचायतीनी कंपनीच्या तिसऱ्या फेजला विरोध करावा - सी आर म्हात्रे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पूर्वीचे Nippon इस्पात आत्ताचे JSW..नामकरण,सुरुवातीच्या काळात,लोकांना नोकऱ्या,कंत्राट मिळत होते,सभोवती मोकळा परिसर मिळाला होता,त्यामुळे कंपनीमध्ये प्रवेश करायला स्पोपकर होते..पण जसजसे मोठ मोठे,सयंत्र बसविले जाऊ लागले, सुरक्षिततेच्या नावाखाली शेवटी no entry... झाली आत्ता तर प्रवेश बंद.पेण तालुक्यात कुशल,अकुशल कामगार खूप आहेत,तरुण मोठ्याप्रमाणावर नोकऱ्या शोधत आहेत,त्या सर्वांनाच काम द्या... फक्त मोजक्या लोकांस कोटा देतात त्यांना पुन्हा चिरीमिरी देऊनच काम मिळते शिवाय आयुष्यभर गुलामी ठरलेली.Jsw तिसरा फेज सुरू करत असताना,नोकरी तर नाहीच मिळणार उलट खाडी किनारची गावेच खाडीत खोदकाम केल्याने पूरग्रत होतील,बांध तुटून जातील कटू पण सत्य आहे .

खाडी म्हणजे जिवंत शेत,जशी शेती तशीच खाडी कोळी बांधवांची शेती आहे. खाडी खोदली की माश्यांची वाढ थांबते. मासे आणि भात हेच अन्न नष्ट होईल.त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी कंपनीच्या या तिसऱ्या फेसला विरोध करावा अशी मागणी पेण तालुक्यातील वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी.आर म्हात्रे यांनी केली आहे

तिसऱ्या फेजसाठी पुन्हा खाडी खोदणार,तीच माती,दगड कुठेतरी विकणार,हे उद्योग सुरू राहणार,बंधारे तुटणार,परिसर बुडणार,शेती नष्ट होणार,अगदी वाशी नाका पर्यंत पाणीच पाणी घुसणार..याचे. कारण नैसर्गिक रचना बदलणार,प्रवाह वाढून किनाऱ्याची अधिकच झीज होणार.

खारफुटी म्हणजे नैसर्गिक भिंत,तीच नष्ट होणार,पर्यावरणाला, पशू,पक्षांचे स्थलांतर होणार,कोस्टल रिजनल झोन ,यात कोणतीही परवानगी नसेल ते बेकादेशीर असेल,कदाचित jsw ने ते कायद्यात पण बसविले असेल.

मोठ मोठी जहाजे ये जा करणार त्यांचे इंधनं पाण्यात मिसळणार हेच रासायनिक विष जलचरणा घातक ठरणार.ध्वनी प्रदूषण,त्वचारोग होणार हे नक्की.आज आपल्या परिसरात पुणेरी पाऊस पडतो. मुसळधार पाऊस गायब,पनवेल अलिबाग पेक्षा पर्जन्यमान कमी झाले आहे. एक दिवस पर्जन्य छायेचा प्रदेश बनेल हे नक्कीच.

यात स्थानिकांना नोकरीची संधी कमी,परप्रांतियांना जास्त, आपल्या भविष्यासाठी लढा,आज गप्प बसविता येत भावी पिढी माफ करणार नाही,ती स्मशान भूमी पर्यंत येणार नाही.

खाडी खोदकाम म्हणजे मासे, पाणी ,झाडे,जमीन,पाणथळ जीव,वनस्पती नष्ट होतील,पूर्वीच्या लहान जीवांचा पत्ताच नाही.एकंदर उघडा डोळे पहा नीट.....

निःस्वार्थ सेवा करा,समाज वाचवा. नाहीतर विनाशकाले विपरीत बुद्धी झाल्याशिवाय राहणार नाही त्यामुळे जेएसडब्ल्यू कंपनीच्या तिसऱ्या फेजला वाशीसह परिसरातील 20 ग्रामपंचायतीने कायमस्वरूपी विरोध करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सी.आर म्हात्रे यांनी केली आहे

## गरिबीची वेदना

गरिबीत, गरिबाला
वेदनेची पर्वा नाही,
दुःखं अनेक, पण ऐकायला
कोण नाही...!!

राबतो तो सर्वांसाठी,
घेऊन दुःख पाठी,
एवढं करूनही विचारतात –
"काय केलं आमच्या साठी?"

कामापुरता दिला जातो,
गरिबाला खोटा मान,
अशिक्षित तो त्याला वाटते –
हीच माझी आहे शान...!!

जेव्हा येते खऱ्या मानाची वेळ,
तेव्हाच होते सत्याची खरी जाण!!
आणि कळते त्याला सगळे आहेत
बेईमान.!!

(कवी - दिगंबर आगिवले)

# शहापूर आदिवासी विकास प्रकल्प – भ्रष्टाचाराचे कुरण!

## प्रकल्प अधिकारी हिवाळे यांच्यावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर अंतर्गत २०२३–२४ आणि २०२४–२५ या काळात शासकीय निधीच्या वापरात गंभीर अपारदर्शकता, अनियमितता आणि सरळसरळ भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप प्रकल्प अधिकारी राजेंद्र हिवाळे यांच्यावर करण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्ते अण्णा मोतीराम साळवे यांनी यासंदर्भात थेट संबंधित अधिकाऱ्यांना लेखी तक्रार सादर केली असून, तात्काळ चौकशी न झाल्यास मंत्रालय व न्यायालयीन स्तरावर आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.




आण्णा साळवे यांनी तक्रारीत म्हटले आहे की, मार्च २०२४ मध्ये प्रकल्पातील अनेक शासकीय आश्रमशाळांमध्ये जनरेटर दुरुस्ती, वॉटर हिटर, संडास टाकी सफाई, जंतुनाशक फवारणी, पाण्याचे फिल्टर आदी कामे प्रत्यक्षात न करता खोट्या बिलांवर लाखो रुपये काढण्यात आले आहेत. अनेक शाळांतील मुख्याध्यापकांवर ५०% कमिशनसाठी दबाव टाकण्यात आला असून, विरोध करणाऱ्यांवर मानसिक दबाव आणला जात आहे.

जिल्हा नियोजन निधी व क्रीडा स्पर्धांचे बजेट मधूनही बनावट खर्च दाखवून निधीची लूट सुरू असून, स्वतःच्या नातलग ठेकेदारांना कामे देऊन पैशांचे उघड उघड वाटप केल्याचे धक्कादायक तपशील समोर येत आहेत. सामान्य कर्मचारी, शिक्षक यांच्यावर कामासाठी पैसे उकळले जात असून, त्यांच्या बिलांना दुय्यम स्थान दिले जात आहे.

ही बाब केवळ आर्थिक भ्रष्टाचारापुरती मर्यादित नसून ती आदिवासी विद्यार्थ्यांचे आणि समाजाचे हक्क लुटणारी आहे. संबंधित अधिकाऱ्यांची तात्काळ चौकशी झाली पाहिजे, अन्यथा सचिव, आयुक्त आणि आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे तक्रार, तसेच न्यायालयीन लढाई लढण्यात येईल."

प्रकल्पातील कर्मचाऱ्यांनी मौन बाळगले असले तरी, अण्णा साळवे यांच्या तक्रारीमुळे आदिवासी प्रकल्प प्रशासन हादरले आहे. आता शासन याकडे गांभीर्याने लक्ष देणार का, हाच मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

# रुची जाधवने पटकावला 'मिस मल्टिनॅशनल टीन दिवा' हा किताब

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : खेडेगावातील कुणबी मुलगी रुची संध्या सुखदेव जाधव मु.वावेघर, ता.कल्याण, जि.ठाणे हिने miss multinational teen diva हा किताब नुकताच जयपूर राजस्थान इथे पटकावला. सध्या ती कल्याण शहरात राहायला आहे. तिचे आईवडील समाजसेवी वृत्तीचे असून एका मध्यम वर्गातून ती आली आहे.

भारतातील सर्वांत मोठी किशोरवयीन सौंदर्य स्पर्धा असून,तीथे विविध देशांतील किशोरवयीन मुली सहभाग घेतात. यामध्ये केवळ सौंदर्य नव्हे तर आत्मविश्वास, बुद्धिमत्ता, कला, नेतृत्व आणि सामाजिक भान हेसुद्धा महत्त्वाचे घटक असतात.



**भारतातील सर्वांत मोठी किशोरवयीन सौंदर्य स्पर्धा असून,तिथे विविध देशांतील किशोरवयीन मुली सहभाग घेतात**

National Multinational आणि Universe आशा तीन विभागात पार पडते. त्यातील multinational या प्रकारात तिने हे घवघवीत यश मिळवले आहे.त्याबद्दल रुचीचे, तिच्या मागे खंबीरपणे उभे राहणारे आई वडील संध्याताई आणि सुखदेव जाधव यांचे सर्वत्र अभिनंदन आणि कौतुक होत आहे.

तिचे या स्पर्धेतील घवघवीत यश समाजासाठी, जिल्ह्यासाठी, राज्यासाठी खूपच भूषणावह आहे.

# शासनाच्या फ्लॅगशिप योजनेची ग्रामीण भागात जनजागृती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : भारत सरकार, युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय अंतर्गत मेरा युवा भारत ठाणे द्वारा महाराष्ट्र युवा संघ कल्याण (जिल्हा युवा स्स्था पुरस्कार महाराष्ट्र शासन) व वाईल्ड इंडिया ०५ फाऊंडेशन व गर्जा प्रतीष्ठाण मुरबाड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फ्लॅगशिप योजना कार्यक्रम मंगळवारी कै. अविनाश बोंबे सभागृह, वन विभाग, तालुका मुरबाड येथे राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती व जनजागृती कार्यक्रमाची सुरूवात गर्जा प्रतीष्ठानच्या पथनाट्याने झाली.



पथनाट्यात जातिवाद, मोबाईलचा दुरुपयोग, प्रेमासाठी नवऱ्याची हत्या, स्त्री विनयभंग, पर्यावरण, स्वच्छता साठी युवक युवतींना जनजागृती करण्यात आली. यावेळी मेरा युवा भारत ठाणे जिल्हा युवा अधिकारी मनिषा शर्मा, स्वच्छ भारत मिशन गट समन्वयक राजेश वाघे, योगेंद्र बांगर, राज्य युवा पुरस्कार अजित कारभारी आदींसह वन विभागाचे अधिकारी यांचे मार्गदर्शन युवक युवतींना लाभले. मेरा युवा भारत ठाणेच्या जिल्हा युवा अधिकारी मनिषा शर्मा यांच्याहस्ते सहभागी १३३ युवक युवतींना मेरा युवा भारत ठाण्याचे भारत सरकारचे प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

# बाळाशेठ घरत यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड(दिलीप पवार) : मुरबाड तालुक्यातील युवा उद्योजक, समाजसेवक तथा आमदार किसन कथोरेंचे खंदे समर्थक जयवंत (बाळाशेठ ) विठ्ठल घरत यांचा 5 ऑगस्ट वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

नवचैतन्य निवासी मतिमंद विद्यालय कान्होळ व गुरूकुल आश्रम साकुर्ली या दोन्ही ठिकाणी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना बाळाशेठ घरत यांनी फळे व खाऊचे वाटप करून सामाजिक उत्तर दायित्व दाखवून दिले तसेच त्यांच्या सोबत केक कापुन वाढदिवस साजरा करण्यात आला.



बाळाशेठ घरत हे एक उत्तम व्यवसायिक असून त्यांनी त्यांच्या गणेशकृपा बिल्डिंग मटेरियल सप्लायर्सच्या माध्यमातून त्यांनी अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे तर त्यांच्या पत्नी सौ.रेश्मा घरत या कान्होळ-बोरीवली ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच आहेत. या दोन्ही दांम्पत्याने आमदार किसन कथोरेंच्या सहकार्याने व मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतमध्ये आदिवासी, दलीत वस्तीसह विविध विकासात्मक कामे केली असून सरपंचानी महिला सबलीकरण व सक्षमीकरण करून एक आदर्श ग्रामपंचायत निर्माण केली आहे.

नेहमीच गरजूंना मदतीसाठी सदैव तत्पर असणारे हे व्यक्तिमत्व यांच्या वाढदिवसा निमित्त मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे, टि.डी.सी.बँकेचे संचालक राजेश पाटील, उल्हास बांगर, सुहास मोरे, अनिल वायले ,दिपक पवार, अनिल घरत,प्रदीप चौधरी, यांच्यासह म्हसा पंचक्रोशीतील त्यांच्या शेकडो हितचिंतकांनी त्यांना वाढदिवसा निमित्त शुभेच्छा दिल्या.

## सवयी आपले भविष्य

आज आम्ही तुम्हाला एका सामान्य सवयीबद्दल सांगणार आहोत, जी जर तुम्ही आज बदलली नाही तर तुम्हाला खरोखर पश्चात्ताप करावा लागू शकतो. ही सवय 'टाळण्याची' प्रवृत्ती आहे.

'उद्यावर गोष्ट ढकलणे इतके धोकादायक का आहे?

आपण सर्वजण एका वेळी किंवा दुसऱ्या वेळी गोष्टी पुढे ढकलतो, मग ती बिल भरणे असो, महत्त्वाचा ईमेल पाठवणे असो किंवा जिमला जाणे असो. पण जेव्हा ती नियमित पद्धत बनते तेव्हा त्याचा तुमच्या उत्पादकतेवर, मानसिक आरोग्यावर आणि अगदी शारीरिक आरोग्यावर गंभीर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

टाळणे म्हणजे फक्त आळस नाही, असे प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ आणि जीवन प्रशिक्षक म्हणतात; हे बहुतेकदा ताणतणाव, अपयशाची भीती किंवा कामाच्या आकाराचे अतिरेकी मूल्यांकन यामुळे होते. यामुळे एक दुष्टचक्र तयार होते: तुम्ही कामात दिरंगाई करता, नंतर ताण वाढतो आणि तुम्ही आणखी काही दिरंगाई करता.

कामात दिरंगाईचे तोटे

वाढता ताण आणि चिंता: जेव्हा तुम्ही कामात दिरंगाई करता तेव्हा शेवटच्या क्षणी सर्वकाही पूर्ण करण्याचा दबाव वाढतो, ज्यामुळे ताण आणि चिंता वाढते.

संधी गमावणे: महत्त्वाच्या मुदती चुकवणे किंवा वेळेवर कृती न केल्यामुळे संधी निसटू देणे.

आरोग्यावर वाईट परिणाम: ताणतणावामुळे निद्रानाश, अनियमित खाण्याच्या सवयी आणि शारीरिक हालचालींचा अभाव यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

नातेसंबंधांमध्ये बिघाड: जेव्हा तुम्ही तुमचे वचन पूर्ण करत नाही तेव्हा वैयक्तिक आणि व्यावसायिक संबंधांमध्ये विश्वास कमी होऊ शकतो.

आत्मसन्मान कमी होणे: वारंवार कामात दिरंगाई आणि अपयश तुमचा आत्मविश्वास कमी करू शकते आणि तुम्हाला अक्षम वाटू शकते.

# पलावा उड्डाणपुलाच्या कामाचे व्हीजेटीआयमार्फत स्ट्रक्चरल ऑडिट

### - माजी आमदार प्रमोद पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण शिळफाटा मार्गावरील देसाई-निळजे-काटई (पलावा) या अत्यंत महत्त्वाच्या उड्डाणपुलाच्या कामात होत असलेल्या ढिसाळपणा, अर्धवट स्थिती आणि वाहतुकीस होणारा त्रास लक्षात घेता, माजी आमदार प्रमोद (राजू) पाटील यांनी १ जून रोजी प्रत्यक्ष पाहणी केली होती. त्यावेळीच पुलाच्या कामाची गुणवत्ता ही अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. याच निरीक्षणाच्या आधारावर ३ जून रोजी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून, व्हीजेटीआय संस्थेमार्फत स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची अधिकृत मागणी त्यांनी केली होती.





या मागणीची शासनाने गंभीर दखल घेतली असून, ५ ऑगस्ट रोजी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत आदेश काढून व्हीजेटीआय संस्थेमार्फत ऑडिट करण्याचे निर्देश संबंधित विभागाला देण्यात आले आहेत. तसेच, यासंदर्भात सविस्तर अहवाल सादर करण्याची सूचनाही देण्यात आली आहे.

या पुलाच्या कामावर केवळ एका महिन्यात खड्डे पडलेले दिसत आहेत, जे कामाच्या गंभीर हलगर्जीपणाचे व निकृष्ट दर्जाचे प्रतिक आहेत. अशा परिस्थितीत राजू पाटील यांनी वेळेवर घेतलेली तांत्रिक आणि सार्वजनिकदृष्ट्या सजग भूमिका योग्य आणि आवश्यक ठरली आहे. यापूर्वीही, कल्याण-शिळ रस्त्याच्या कामाच्या गुणवत्तेबाबत हरकत घेतल्यानंतर ३० पॅनल बदलण्याची नामुष्की ठेकेदारावर आली होती. या सर्व घटनांवरून राजू पाटील यांची निरीक्षणशक्ती, तांत्रिक सजगता आणि विकासकामांबाबतची जबाबदारीची भावना अधोरेखित होते.

## आजचे राशि भविष्य

**मेष**
ऑफिसमध्ये कामाचा ताण जास्त असू शकतो. कौटुंबिक जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडाल. गुंतवणूक भविष्यासाठी फायदेशीर ठरेल.

**वृषभ**
काही जुन्या जमिनीतून आर्थिक फायदा होईल. काम स्वतः पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. इतरांकडून अपेक्षा ठेवल्याने कार्यक्षमता कमी होईल.

**मिथुन**
आम्ही ही कमतरता दूर करू आणि आमच्या कामासाठी समर्पित राहू. इतरांच्या सल्ल्यावर अवलंबून न राहता, स्वतःहून निर्णय घ्या.

**कर्क**
समाजात तुमचा आदर आणि वर्चस्व कायम राहील. तुम्ही कोणतेही काम पूर्ण करू शकाल. आज तुम्हाला नवीन संधी मिळू शकते.

**सिंह**
मालमत्तेच्या खरेदी-विक्रीशी संबंधित काम करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे.तुम्हाला अधिकाऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेल.

**कन्या**
मेहनत आणि चांगली जीवनशैली सकारात्मक परिणाम देईल. मुलाच्या करिअरशी संबंधित कोणत्याही चिंतेवर उपाय मिळाल्याने आराम मिळेल.

**तूळ**
अधिकृत प्रवास तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. सामाजिक संपर्कातून काही नवीन माहिती मिळेल, जी तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

**वृश्चिक**
कामे लवकर पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम कराल, यशस्वी देखील व्हाल. काळ तुमच्यासाठी मोठी उपलब्धी निर्माण करत आहे.

**धनु**
मित्रांना भेटण्याची संधी मिळेल आणि मनोरंजनाने भरलेले वातावरण असेल. व्यस्त असूनही तुम्ही तुमची वैयक्तिक कामे सहजपणे पूर्ण करू शकाल.

**मकर**
वैयक्तिक कामावरही लक्ष केंद्रित करू शकाल. घरामध्ये काही नवीन जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतील. काम पुढे ढकलणे योग्य नाही.

**कुंभ**
आर्थिक स्थिती मजबूत करण्याच्या तुमच्या प्रयत्नांना मोठ्या प्रमाणात यश मिळेल.आत्मविश्वास आणि मेहनत तुम्हाला तुमच्या कामात यश देईल.

**मीन**
चांगली बातमी मिळाल्याने कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील.दिवस यशाचा काळ असेल. नियोजन करून दैनंदिन दिनचर्या व्यवस्थित कराल

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558



# पनवेल : कासाडी नदीच्या प्रदूषणात वाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल, ता. 6 (वार्ताहर)**

**पनवेल** - पनवेल महानगरपालिकेच्या क्षेत्रातील तळोजा औद्योगिक वसाहतीला खेटून असलेल्या कासाडी नदीत गंभीर प्रमाणात प्रदूषण वाढल्यामुळे असेच हे प्रदूषण सुरू राहील्यास भविष्यात तळोजा परिसर धोक्यात येण्याची भिती "पर्यावरण स्थिती अहवाल २०२४-२५" यामध्ये नमूद करण्यात आले आहे. या अहवालानूसार कासाडी नदीतील जल गुणवत्तेचे परीक्षण केल्यानंतर ही धक्कादायक बाब आढळली. नदीपात्रातील पाण्यामधील बायोकेमिकल ऑक्सीजन डिमान्ड (बीओडी) आणि केमिकल ऑक्सीजन डिमान्डचे (सीओडी) प्रमाण अतिशय जास्त असून, ते मान्य मयदिपेक्षा कितीतरी अधिक आहे.

विशेषतः सीओडीचे प्रमाण काही ठिकाणी २८० एमजी-लीटर एवढे आहे, जे अत्यंत धोकादायक गणले जाते ही बाब या अहवालात नमूद करण्यात आली आहे. विशेष म्हणजे तळोजा कारखान्यांमधून निघणा-या रासायनिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सामाईक सांडपाणी शुद्धीकरण केंद्र सूरळीत चालू असल्याचा दावा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (एमआयडीसी) केला जात होता. या अहवालामुळे एमआयडीसी प्रशासनाच्या अधिका-यांचा दावा फोल ठरला आहे. उद्योग क्षेत्रात नियमबाह्यपणे काम केल्यास कारखानदारांवर कारवाईचे अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण अधिका-यांना आहेत. मात्र एमपीसीबीकडून तळोजातील पर्यावरण बचावासाठी कठोर कारवाई होताना दिसत नाही.

# उल्हासनगरात बोगस डॉक्टरला अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** उल्हासनगरमध्ये तब्बल सात वर्षांपासून रुग्णांच्या जीवाशी खेळणाऱ्या एका बनावट डॉक्टरचा अखेर पर्दाफाश झाला आहे.

कोणतीही वैद्यकीय पदवी किंवा परवाना नसताना 1 'डॉक्टर' म्हणून दवाखाना चालवत असलेल्या श्रीकृष्ण कुमावत याला विठ्ठलवाडी पोलिसांनी अटक केली असून, न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

उल्हासनगर कॅम्प ४ परिसरातील एसएसटी महाविद्यालयाजवळील 'साई क्लिनिक' या खासगी दवाखान्यात कुमावत २०१८ पासून रुग्णांवर खोटे उपचार करत होता. त्याच्याकडे कोणताही वैद्यकीय परवाना नसतानाही तो इंजेक्शन देणे, औषधे लिहून देणे, तपासणी करणे यांसारख्या वैद्यकीय सेवा देत होता. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते.

# विकासाच्या नावाखाली ठाणे जिल्ह्यातील मच्छिमारांवर उपासमारीचे संकट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील पारंपरिक मासेमारी करणाऱ्या कोळी समाजाच्या उपजीविकेला विकासाच्या नावाखाली मोठा धक्का बसत आहे. खाडी व खाजण क्षेत्रांमध्ये झपाट्याने चाललेल्या शहरविकास, बंदर प्रकल्प, खाडी भराव आणि औद्योगिक अतिक्रमणामुळे मासेमारीसाठी आवश्यक असलेले नैसर्गिक पर्यावरण दिवसेंदिवस नष्ट होत चालले आहे. त्यामुळे शतकानुशतक चालत आलेला कोळी समाजाचा पारंपरिक व्यवसाय धोक्यात आला असून, रोजगाराचा मुख्य आधार हिरावला जात आहे.

या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय कोळी समाज (नोंदणीकृत), दिल्लीच्या ठाणे जिल्हा शाखेतर्फे जिल्हाधिकारी, ठाणे यांना मंगळवारी निवेदन सादर करण्यात आले. राष्ट्रीय मत्स्यपालन धोरण २०२० चा संदर्भ देत, पारंपरिक मासेमारीस पूरक वातावरण निर्माण करण्याच्या मागण्या या निवेदनात मांडण्यात आल्या.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, खाडी किनाऱ्यावर वास्तव्यास असलेल्या कोळी समाजाचे जीवनचक्र पूर्णतः मासेमारीवर आधारित आहे. मात्र सध्या विकासाच्या नावाखाली चाललेल्या प्रकल्पांमुळे त्यांचे नैसर्गिक जलस्रोत, जाळी टाकण्याच्या जागा, मासे प्रजनन क्षेत्रे आणि विक्रीसाठी लागणाऱ्या सुविधा या सगळ्याच गोष्टी बुडीत चालल्या आहेत. परिणामी शेकडो कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असून, मच्छीमार समाजात अदृश्य बेरोजगारी प्रचंड प्रमाणात वाढली आहे.

या निवेदनावर ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद कोळी यांच्या स्वाक्षरीसह मागण्या सादर केल्या गेल्या असून, शासनाने याबाबत सकारात्मक भूमिका घेऊन पारंपरिक मासेमारीस पुनरुज्जीवित करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे.

# दिव्यांगांना रस्ता ओलांडण्यासाठी ठाणे मनपाची 'ग्रीन सिग्नल' यंत्रणा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** वाहनांच्या वर्दळीने वेढलेल्या चौकात दिव्यांग, दृष्टिहिनांना रस्ता ओलांडण्यासाठी इतरांवर अवलंबून राहावे लागते. मात्र ठाण्यातील तीन हात नाका चौकात आता दिव्यांग, दृष्टिहिनांसाठी 'ग्रीन सिग्नल' यंत्रणा ठाणे महापालिकेच्या वतीने सुरू करण्यात आली आहे. या ठिकाणी एकूण ७ रस्ते एकत्र येत असल्याने वाहतुकीची प्रचंड वर्दळ असते. त्यामुळे या चौकाचा प्रत्यक्ष अभ्यास व सर्वेक्षण करून ही यंत्रणा बसवण्याचा निर्णय घेण्यात आला.

> ही ग्रीन सिग्नल डोळस नागरिकांनाही मार्गदर्शक ठरेल, दृष्टिहिनांसोबत विशिष्ट मार्गिकेवरून रस्ता ओलांडणे, वाहने धावत असताना रस्ता क्रॉस न करणे अशा बाबी सर्वसामान्यांच्या अंगवळणी पडण्यास मदत होणार आहे. सुरुवातीला तीन हात नाका चौकात ही यंत्रणा बसवण्यात आल्यानंतर टप्प्याटप्प्याने ठाणे शहरातील इतर चौकांत आणि वर्दळीच्या ठिकाणीदेखील ही यंत्रणा बसवण्यात येणार आहे.

विशेष रॅम्प, बीपर यंत्रणेने दिव्यांगांसह दृष्टीहिनांना रस्ता ओलांडणे सुलभहोणार आहे.

ठाण्यात तीन हात नाका, नितीन कंपनी व कॅडबरी जंक्शन, कापूरबावडी-माजिवडा अशा मुख्य चौकात एकाचवेळी अनेक रस्त्यांवर वाहने येतात. असे लहानमोठे चौक व सिग्नल शहरांतील विविध भागांत आहेत. याठिकाणी एखाद्या डोळस व्यक्तीलाही रस्ता ओलांडताना अडचणींना तोंड द्यावे लागते. दृष्टिहीन व्यक्तींची अवस्था इच्छितस्थळी पोहचताना बिकट होत असल्याने



ठाण्यात 'ग्रीन सिग्नल' यंत्रणा राबवण्याचा निर्णय ठाणे महापालिका आणि वाहतूक शाखेच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आला होता.

या अभियानाचा एक भाग म्हणून रस्त्यांवरील चौकाच्या ठिकाणी पादचाऱ्यांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडता यावा याकरीता ग्रीन सिग्नल व्यवस्था तयार करणे, मुख्यत्वे दृष्टीहीन आणि दिव्यांगांना सिग्नलवर रस्ता ओलांडणे सुलभ, सुरक्षित व्हावे, याबाबत ठाणे वाहतूक शाखेचे माजी पोलिस उपायुक्त डॉ. विनयकुमार राठोड यांनी ही संकल्पना तत्कालीन ठाणे पालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे मांडली होती. त्या अनुषंगाने शहर वाहतूक विभागामार्फत अशा प्रकारचे काम करणाऱ्या विविध सेवाभावी संस्था यांच्यामार्फत प्रत्यक्ष जागेचे सर्वेक्षण करून दरपत्रके प्राप्त करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तब्बल दीड वर्षांच्या प्रतीक्षेनंतर सोमवारी ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. दिव्यांगांनी सुरक्षितरित्या रस्ता ओलांडून यंत्रणेला सुरुवात केली.

# मीरा-भाईंदरची परिवहन सेवा ठेकेदाराच्या भरवशावर

## सातत्याचे बिघाड , नादुरुस्त बसगाड्यांमुळे प्रवाशांवर धक्का मारण्याची वेळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** ठेकेदाराच्या भरवशावर सुरू असलेल्या मीरा-भाईंदर महापालिका परिवहन सेवेतील खटारा झालेल्या बसमधून प्रवाशांना प्रवास करावा लागत असून रविवारी संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास दहिसर येथून काशिमिरा येथे आलेली बस अचानक बंद पडल्याने प्रवाशांच्या खोळंबा झाला. बस चालू करण्यासाठी बसमधून उतरलेल्या प्रवाशांसह वाहतूक पोलिसांनीही बसला धक्का मारण्यासाठी हातभार लावला.

दोनच दिवसांपूर्वी परिवहन सेवेतील चालक व वाहकांनी त्यांची इच्छित देणी मिळत नसल्याने अचानक सकाळच्या सुमारास संप पुकारून बससेवा बंद केली होती. ठेकेदाराच्या भरवशावर सुरू असलेल्या महापालिका परिवहन सेवेतील बस परिवहन सेवेला तांत्रिक अनुभव असलेला अधिकारी उपलब्ध नसल्याने महापालिका परिवहन बस सेवा ठेकेदाराच्या इशाऱ्यावर सुरू आहे. एकूण 28 बसेस दुरुस्तीअभावी घोडबंदर येथील आगारात दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असल्याने बस प्रवाशांना इच्छित बस पकडण्यासाठी बराच वेळ प्रतीक्षा करावी लागत आहे. अशातच रविवारी संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास



दहिसर येथून आलेल्या बस क्रमांक (एम एच ०४ ईपी ०५२९) या बसचा तांत्रिक बिघाड झाल्याने बस तिथेच उभी राहिली. बसमधील प्रवाशांनी चालक व वाहकाशी वाद घालून आम्ही जर तिकिटाचे पैसे पूर्ण दिले आहेत तर आम्हाला आमच्या इच्छितस्थळी सोडण्याची व्यवस्था करा, यावरून बाचाबाची झाली. मात्र थोड्याच वेळात प्रवाशांनी समझोता करून बंद पडलेल्या बसला धक्का मारून चालू करण्यासाठी हातभार लावत वाहतूक पोलिसांचाही मदत घेतली.

धक्का स्टार्ट झालेल्या बसला प्रवास करण्यासाठी बसमध्ये प्रवासी बसले, मात्र गियरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने प्रवाशांना बसमधून उतरून खाजगी वाहनाने आपल्या इच्छितस्थळी जावे लागले. खिळखिळया झालेल्या खटारा बसमधून दररोज हजारो प्रवाशांना प्रवास करावा लागत असून पालिका प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याने प्रवासी परिवहन सेवेच्या अधिकाऱ्यांना लाखोली वाहत आहेत.

# माजी आमदार गणपत गायकवाड यांचा जामीन अर्ज हायकोर्टाने फेटाळला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** उल्हासनगर येथे शिवसेना शिंदे गटाचे नेते महेश गायकवाड यांच्यावर पोलीस ठाण्यात गोळीबार करणारे भाजपचे माजी आमदार गणपत गायकवाड यांना मंगळवारी उच्च न्यायालयाने मोठा दणका दिला. न्यायमूर्ती अमित बोरकर यांनी गणपत गायकवाड यांचा जामीन अर्ज फेटाळून लावला. गोळीबारासारख्या गंभीर गुन्ह्यात जामीन मंजूर केल्यास कायद्यापुढे कोणीही मोठा नाही, या तत्त्वाला धक्का बसेल, असे न्यायमूर्ती बोरकर यांनी जामीन नाकारताना स्पष्ट केले.

उल्हासनगर येथील हिललाईन पोलीस ठाण्यामध्ये गेल्या वर्षी



फेब्रुवारीमध्ये गोळीबाराची घटना घडली होती. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे कल्याण अध्यक्ष महेश गायकवाड आणि इतर दोघे वरिष्ठ पोलिस निरीक्षक (पीआय) अनिल जगताप यांच्या केबिनमध्ये बसले होते.

त्यावेळी गणपत गायकवाड व त्यांचे सहकारी केबिनमध्ये घुसले आणि महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केला. महेश गायकवाड यांच्या शरीरात सात गोळया घुसल्या होत्या. याप्रकरणी पोलिसांनी गणपत गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांविरोधात हत्या करण्याचा प्रयत्न आणि इतर कलमाखाली गुन्हा दाखल करून अटकेची कारवाई केली होती. त्यानंतर गणपत गायकवाड यांच्यासह त्यांचा अंगरक्षक हर्षल केणे, कुणाल पाटील आणि नागेश बडेराव यांनी जामिनासाठी उच्च न्यायालयात दाद मागितली होती. तथापि न्यायालयाने आरोपींना जामीन नाकारला.

# सीएनजीच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे लालपरीला ब्रेक लावण्याची नामुष्की



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** एकीकडे घटत असलेली प्रवासी संख्या, तर दुसरीकडे कमी होत असलेले उत्पन्न याच्या कात्रीत सापडलेल्या एसटी महामंडळाला सीएनजीच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे एसटी बसेस स्थानकात उभ्या करून ठेवण्याची नामुष्की ओढवली आहे.

एसटी महामंडळाच्या बस टप्प्याटप्प्याने सीएनजीवर चालविल्या जात आहेत. परंतु सीएनजीचा अपुरा पुरवठा, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, अचानक कर्मचाऱ्यांकडून सीएनजी पुरवठा करण्यास असमर्थतता दर्शविणे आदींसह इतर कारणांचा फटका एसटीच्या ठाणे विभागातील जवळपास २४६ सीएनजी बसना बसत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. त्यातही १ ऑगस्ट रोजी तर पहाटे ५ ते दुपारी १२ वाजेपर्यंत केवळ कंत्राट नूतनीकरण न झाल्याचा फटका एसटीच्या ३० ते ४० बसला बसल्याचे दिसून आले आहे. ठाणे विभागात एसटीच्या ५१६च्या आसपास बस आहेत. त्यातील २४६ बस या सीएनजीमध्ये परावर्तीत करण्यात आल्या आहेत. तर २७० बस या आजही डिझेलवर चालविल्या जात आहेत. या बसदेखील टप्प्याटप्प्याने सीएनजीमध्ये परावर्तीत करण्यात येणार आहेत. एसटीच्या ठाणे २, विठ्ठलवाडी आणि भिवंडी येथे सीएनजीची डेपो आहेत, तर ठाणे १ मध्ये सीएनजीच्या ४३ च्या आसपास आणि ठाणे २ मध्ये ५५ च्या आसपास सीएनजीवर धावणाऱ्या बस आहेत.

प्रदूषण रोखण्यासाठी डिझेलवर धावणाऱ्या बस सीएनजीवर परावर्तीत केल्या जात आहेत. परंतु आता याच सीएनजीची फटका एसटीसह प्रवाशांना देखील सहन करावा लागत आहे. १ ऑगस्ट रोजी पहाटे ५ ते दुपारी १२ वाजेपर्यंत खोपट डेपो येथे असलेल्या सीएनजीच्या केंद्रावर सीएनजी भरण्यासाठी एकही कर्मचारी आला नाही. त्यामुळे याठिकाणी बसच्या रांगा लागल्या होत्या.

अखेर एसटी विभागाच्या अधिकाऱ्यांनी मध्यस्थी केल्यानंतर सीएनजी भरण्यास सुरुवात झाली. परंतु तो पर्यंत सकाळच्या सत्रात ३० ते ४० फेऱ्या ठाणे १ व २ मधून रद्द झाल्याची माहिती एसटीच्या सूत्रांनी दिली. तर काही बस या ठाण्यातील विविध मार्गावर लेटमार्क लागल्याचे दिसून आले. एकूणच मागील ८ महिन्यात तब्बल २१ वेळा अशा एसटीला फटका बसला असून त्यातून प्रवाशांना त्रास आणि एसटीला नुकसान देखील सोसावे लागल्याची बाब समोर आली आहे.

**एसटीच्या ताफ्यात सीएनजीच्या 246 बस आहेत. या बस ठाण्यासह भिवंडी, कल्याण, बोरिवली, मीरारोड आदींसह इतर काही मार्गांवर धावत आहेत. शिवाय काही बस या राज्यातील इतर काही भागांतही जात असल्याची माहिती एसटी विभागातील सूत्रांनी दिली.**

**सीएनजीच्या अडचणी**

नोझल मॅच होत नसल्याने सीएनजी भरता न येणे, सीएनजी पंपाचे कॉम्प्रेसरचे काम असल्याने ठाणे २ च्या आगारच्या बसमध्ये सीएनजी भरला आला नाही, पंप मेटेंनन्ससाठी बंद, हाय व्होल्टेजमुळे पंप बंद असणे, वीजपुरवठा खंडित झाल्याने सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत पंप बंद, कमी व्होल्टेजमुळे पंप बंद ठेवणे, तांत्रिक कारणासाठी पंप बंद ठेवणे, सीएनजी कर्मचाऱ्यांनी संप पुकारल्याने त्याचा फटकाही बसल्याचे दिसून आले.

# मेट्रो स्थानकांखाली स्वतंत्र थांबे निर्माण करा

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या सूचना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** कापुरबावडी ते घोडबंदर मार्गावरील ८ मेट्रो स्थानकाच्या खाली स्वतंत्र प्रवासी थांबे निर्माण करावेत. जेणेकरून प्रवाशांना मेट्रो मधून उतरल्यानंतर पूरक वाहतूक व्यवस्था निर्माण होईल ! अशा सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संबंधित मेट्रोच्या अधिकाऱ्यांना केल्या. ते मेट्रो स्थानके व त्या अनुषंगिक विविध विकास कामांच्या पहाणी दौऱ्याच्या अनुषंगाने बोलत होते. यावेळी ठाणे महापालिका , मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण , वाहतूक विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. मंत्री सरनाईक म्हणाले की ५-६ वर्षापूर्वी ठाणे मेट्रो चे काम सुरू झाले तेव्हा सेवा मार्ग हा मुख्य रस्त्याच्या बाजूला होता. परंतु घोडबंदर मार्गावरील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता, तत्कालीन



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विनंती केली की सध्याचा सेवा मार्ग हा मुख्य रस्त्यामध्ये विलीन करावा जेणेकरून घोडबंदर रस्त्यावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न मिटू शकेल! त्या अनुषंगाने ६०० कोटी रुपये अतिरिक्त निधी यासाठी उपलब्ध करून देण्यात आला. सदर काम पावसाळ्यानंतर सुरू करून या वर्षाअखेरीस पूर्ण करावे अशा देखील सूचना मंत्री सरनाईक यांनी या वेळी केल्या. तथापि सेवा मार्ग व मुख्य रस्ता याच्या मधोमध मेट्रोचे स्थानकाचे जिने उतरत असल्यामुळे ते भविष्यात प्रवाशांना धोकादायक ठरू शकतील, अशा तक्रारी नागरिकांकडून येऊ लागल्या. या संदर्भात प्रत्यक्ष पाहणी करून तोडगा काढण्यासाठी या दौऱ्याचे नियोजन केले होते. सध्या सेवा मार्ग मुख्य रस्त्याशी जोडला जात असल्यामुळे रस्त्याची रुंदी वाढलेली आहे. परंतु जिथे मेट्रो स्थानक आहे, तेथे प्रवासी उतरण्या च्या जिन्यालगत प्रवाशांना पूरक वाहतूक व्यवस्था निर्माण करणे गरजेचे असल्यामुळे सदर सेवा मार्ग हा त्या प्रवाशांसाठी स्वतंत्र थांबा म्हणून विकसित करावा अशी मागणी पुढे आली. त्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांना परिवहन मंत्र्यांनी सूचना दिल्या आहेत.




# 'मॅरेथॉन ठाण्याची-उर्जा तरुणाईची '

## येत्या रविवारी ठाणे महानगरपालिकेची ३१ वी वर्षा मॅरेथॉन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (06)** - ठाण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिध्द् असलेली 31 वी ठाणे महानगरपालिका वर्षा मॅरेथॉन यावर्षी 10 ऑगस्ट 2025 रोजी होणार आहे. यंदाही स्पर्धेत टाईम टेक्नॉलॉजीचा वापर 21 किमी पुरूष व महिला तसेच 18 वर्षावरील 10 किमीच्या स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे. सदरची स्पर्धा 'मॅरेथॉन ठाण्याची.. उर्जा तरुणाईची' या घोषवाक्याखाली आयोजित करण्यात आली असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय



धावपटूंसह जवळपास 25 हजारांहून अधिक धावपटू धावतील असा विश्वास आहे. या स्पर्धेत महापालिका अधिकारी व कर्मचारी, लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांसह जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत केले.

महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात झालेल्या पत्रकार परिषदेस उपायुक्त उमेश बिरारी, मीनल पालांडे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसाद पाटील आदी उपस्थित होते. रविवार दिनांक 10 ऑगस्ट रोजी सकाळी 6.30 वाजता महापालिका मुख्यालय चौकातून या स्पर्धेला प्रारंभ होणार असून सदर स्पर्धा 12 गटांत घेण्यात येणार आहे.

मॅरेथॉन स्पर्धेसाठी ऑफलाईन नोंदणी एकूण 13860 इतकी झाली आहे. 12 वर्षाखालील मुले 3कि.मी -2378, मुली 3कि.मी – 2051, 15 वर्षाखालील मुले 5 कि.मी – 4641, मुली 5कि.मी- 4018, 18 वर्षाखालील मुले 10 कि.मी- 965, 60 वर्षावरील ज्येष्ठ नागरिक महिला 1 कि.मी – 22, पुरूष कि.मी 11 तर कॉर्पोरेट रन 1 कि.मी साठी 14 आदी नोंदणी झाली आहे. तर ऑनलाईन नोंदणी 1850 इतकी झाली आहे. पुरुष 21 कि.मी खुला गट – 610, महिला 21 कि.मी – 190, 18 वर्षावरील पुरूष 10 कि.मी – 730, 16 वर्षावरील महिला 10 कि.मी – 320 इतकी नोंदणी झाली आहे.

# मुलींवर अत्याचार करणाऱ्या पुणे पोलिसांवर गुन्हा दाखल करा : अंधश्रद्धा निर्मूलन समितीची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पुण्यामध्ये संभाजीनगर येथून एक तरुणी सासरच्या त्रासाला कंटाळून रीतसर शासकीय मदत घेऊन आली. तिच्या तीन मैत्रिणीकडे पुण्यात एक रात्र राहिली. हि विवाहिता सज्ञान असून तिच्या मैत्रिणी ही सज्ञान आहेत. परंतु पुढे पोलिसांनी या तीन मुलींना बेकायदेशीर पणाने, रात्री पोलीस स्टेशनला नेऊन शिवीगाळ, मारहाण, जातीवाचक अवहेलना केली. या घटनेला चार दिवस उलटले, तरीही पोलिसांनी संबंधित पोलीस व कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल केला नाही. त्यामुळे संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी ठाणे जिल्हा, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे कल्याणचे तहसीलदार सचिन शेजाळ यांना निवेदन देण्यात आले. सजग नागरिक म्हणून या मुलींच्या मैत्रिणी व सामाजिक कार्यकर्ते पुण्यामध्ये आंदोलन करीत आहेत. तरी या पिडीत मुलींना न्याय मिळवून देण्यासाठी, राज्याचे गृहमंत्री आणि मुख्यमंत्री म्हणून तात्काळ हस्तक्षेप करावा आणि संबंधित पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यावर अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात यावा. सर्व पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची निष्पक्ष चौकशी करून त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी आणि सासरच्या छळाने आश्रयासाठी बाहेर आलेल्या मूळ पीडित मुलीला ही सुरक्षितता द्यावी असे निवेदन शासनाला देण्यात आले. यावेळी राज्य कायदा विभाग कार्यवाह अॅड तृप्ती पाटील, ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष डॉ सुषमा बसवंत, अॅड आरती हटकर, प्रज्ञा चव्हाण, गौतम जाधव, हनुमंत देडगे हे महाअंनिसचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## पडघा येथील शारदा विद्यालयात
# 'श्रावणधारा' साहित्यीक कार्यक्रम संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित भिवंडी तालुक्यातील पडघा येथील शारदा विद्यालयात "श्रावणधारा"हा साहित्यीक कार्यक्रम विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

स्पंदन अंतर्गत "श्रावणधारा" हा साहित्यिक कार्यक्रम कला वाणिज्य महाविद्यालयात कला वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. नंदीनी वेल्हाणकर प्रभारी प्राचार्या सावित्री क्रांतीकर, शारदा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक दशरथ नाना थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी घेण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात लोककवी व ज्येष्ठ साहित्यिक अरुण म्हात्रे व रमेश तारमाळे छत्रपती शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. नंदकिशोर जोशी सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे उपाध्यक्ष प्राचार्य नारायण फडके यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली यावेळी पार पडलेल्या कार्यक्रमांमध्ये भजन, अभंग, नाट्य संगीत, पोवाडा चित्रपट, नाटक, पुस्तक, अभिवाचन, मंगळागौर, श्रावण गीते अशा अनेक कार्यक्रमांचा सुविद्य संगम पाहायला मिळाला. विचारांना दिशा देणारे व समाजाचे प्रतिबिंब दर्शवणारी शक्ती मराठी साहित्याचा एक समृद्ध व प्रेरणादायी तसेच ज्ञानवर्धक प्रवास साहित्य यात्रेच्या चित्रफितीद्वारे उपस्थित श्रोत्यांनी अनुभवला. शिक्षक व विद्यार्थी सादरीकरणात कु.कल्याणी गायकवाड या विद्यार्थिनीने सादर केलेल्या "छत्रपती शिवाजी महाराजांची न्यायनीती "यावर आधारित पोवाड्यास प्रेक्षकांमधून विशेष दाद मिळाली. तर स्पंदन अंतर्गत श्रावणधारा साहीत्य संरीच्या कार्यक्रमातून शिक्षकांमधील साहीत्यीक कलागुणांना मंच मिळाला असुन भविष्यामध्ये साहीत्यीक प्रतिभेला चालना मिळणार असल्याचे सांगण्यात आले. यावेळी उपस्थितांचे आभार स्वाती भालेराव यांनी मानले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित शेडगे यांनी केले कार्यक्रमाची सांगता निये सर यांच्या पसायदानाने करण्यात आली.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कला व वाणिज्य महाविद्यालय शारदा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,व छत्रपती शिक्षण मंडळाच्या साहित्य मंचाचे सभासद यांनी मेहनत घेतली.

# बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त ठाण्यात जनजाती गौरव दिन कार्यशाळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : भगवान बिरसा मुंडा यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त आणि 15 नोव्हेंबर रोजी साजरा होणाऱ्या जनजाती गौरव दिनाच्या अनुषंगाने आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ.अशोक उईके यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे येथे एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ही कार्यशाळा पार पडली. यावेळी बोलताना आदिवासी विकास मंत्री डॉ.उईके यांनी जनजाती समाजाच्या गौरवशाली इतिहासाची जाणीव सर्वांना होणे आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. यावेळी अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमाचे युवा कार्यप्रमुख वैभव सुरुंगे, अपर आयुक्त गोपीचंद कदम, शहापूर प्रकल्प अधिकारी राजेंद्र हिवाळे, मुंबई विद्यापीठाचे डॉ.रमेश गावीत आणि मंत्रालय मुंबई येथील ललित वराडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### गौरवशाली इतिहासाची जनजागृती आवश्यक

मंत्री डॉ.उईके यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून भगवान बिरसा मुंडा यांची 150 वी जयंती आणि जनजाती गौरव दिन साजरा केला जात आहे. समाजात जनजाती समाजाबद्दल प्रेम, विश्वास आणि सन्मान निर्माण होणे आवश्यक आहे. राणी दुर्गावती, राघोजी भांगरे आणि वीर बाबूराव यांच्यासारख्या अनेक क्रांतीवीरांनी देशासाठी केलेल्या कार्याचा गौरव झाला पाहिजे. आदिवासी विकास विभाग या वर्षात जनजाती समाजाचा गौरवशाली इतिहास लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध उपक्रम राबविणार आहे.

### महिला सबलीकरण आणि विद्यार्थ्यांना मदत

यावेळी त्यांनी आगामी योजनांची माहिती दिली. दि.9 ऑगस्ट 2025 रोजी महाराष्ट्रातील आदिवासी महिलांसाठी 'राणी दुर्गावती आदिवासी महिला सबलीकरण व सक्षमीकरण योजना' सुरू करण्यात येणार आहे. या योजनेतून महिला बचतगटांना कर्ज आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील, असे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर, 'पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना' अंतर्गत वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या 11 वी ते पदवीधर विद्यार्थ्यांना प्रतिमहिना 5 हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाईल.

### प्रदर्शनाचे आयोजन

दि.10 ते 15 नोव्हेंबर 2025 या कालावधीत नागपूर येथे मोठे प्रदर्शन आयोजित केले जाणार आहे. यात देशातील विविध मान्यवर आदिवासी नेते, समाजसेवक, साहित्यिक आणि इतिहासकार यांना एकत्र आणून त्यांच्या ज्ञानाचा लाभ घेतला जाईल. महाराष्ट्रातील 45 जनजातींच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारे प्रदर्शनही भरवले जाईल, जेणेकरून लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना आपली संस्कृती आणि इतिहासाचा अभिमान वाटेल.

प्रमुख वक्ते अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमाचे युवा कार्यप्रमुख वैभव सुरुंगे यांनीही आपल्या भाषणात जनजाती समाजातील विविध क्रांतिकारकांचा इतिहास आणि त्यांच्या योगदानाबद्दल सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमाची प्रस्तावना संचालक डॉ.प्रकाश म्हसरानन यांनी केली. या कार्यक्रमप्रसंगी कार्यक्रमात लव्हाळी आश्रमशाळेतील विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले, ज्याचे मंत्र्यांनी विशेष कौतुक केले.

# गडकरी रंगायतनचे नुतनीकरण अंतिम टप्प्यात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महापालिकेच्या राम गणेश गडकरी रंगायतन या नाट्यगृहाच्या वास्तूचे नूतनीकरण आता अंतिम टप्प्यात आहे. लवकरच रसिकांसाठी रंगायतन खुले होणार आहे. त्यापूर्वी, पूर्ण होत आलेल्या कामांची पाहणी बुधवारी ज्येष्ठ कलाकार, निर्माते आणि पदाधिकारी यांनी केली. नुतनीकरणाच्या झालेल्या कामाविषयी त्यांनी समाधान व्यक्त केले असून लवकरात लवकर या रंगमंचावर प्रयोग करण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांच्यासह, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, ज्येष्ठ निर्माते आणि दिग्दर्शक अशोक हांडे, निर्माते दिलीप जाधव, निर्माते प्रसाद कांबळी यांच्यासह ठाण्यातील नाट्यकर्मी अभिनेते आणि दिग्दर्शक मंगेश देसाई, दिग्दर्शक विजू माने यांनी रंगायतनची पाहणी केली. त्यावेळी, उपायुक्त उमेश बिरारी, उपनगर अभियंता सुधीर गायकवाड, शुभांगी केसवानी, कार्यकारी अभियंता भगवान शिंदे आदी उपस्थित होते.




गडकरी रंगायतनमध्ये रंगमंच, आसन व्यवस्था, ध्वनी व्यवस्था, रंगपट, स्टेजच्या मागची बाजू, सेट आणण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे यांच्या कामांची पाहणी यावेळी करण्यात आली. ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग यांच्यासाठी लिफ्टची व्यवस्था करण्याचा निर्णय स्तुत्य आहेच. त्यासोबत, रंगायतनच्या तळमजल्यावर नाटकासाठी येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी आसनव्यवस्थाही करावी, अशी सूचना आजच्या पाहणीत करण्यात आली. तसेच, पार्किंग व्यवस्था, तालीम हॉल, तिकिट खिडकी, नाटकांचे फलक लावण्यासाठी असलेली जागा यांचीही पाहणी केली.

गडकरी रंगायतनच्या नुतनीकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. जुन्या वास्तूला असलेल्या मर्यादा सांभाळून शक्य तेवढ्या जास्तीच्या सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आज झालेल्या पाहणीच्या वेळी कलाकार, निर्माते यांनी केलेल्या सूचनांचीही महापालिकेने नोंद घेतली आहे. त्यावर तत्काळ कार्यवाही करून लवकरात लवकर रंगायतन नाट्यरसिकांसाठी खुले करण्यात येणार असल्याचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी स्पष्ट केले.

### नुतनीकरणाविषयी कलाकार आणि निर्माते यांनी व्यक्त केले समाधान रंगायतन लवकरच होणार रसिकांसाठी खुले

**गडकरी रंगायतनच्या कामाची आज पुन्हा पाहणी केली. काम चांगले झाले आहे. ध्वनी आणि प्रकाश योजनाही व्यवस्थित आहे. रंगपट आणि बॅक स्टेजला काही सुधारणा सुचवल्या आहेत. आता लवकरात लवकर या रंगमंचावर प्रयोग करण्याची संधी मिळू देत.– प्रशांत दामले, अध्यक्ष अ. भा. मराठी नाट्य परिषद**

**प्रकाशयोजनेबद्दल काही सूचना आजच्या पाहणीत केल्या आहेत. नुतनीकरणाचे उर्वरीत काम चांगले झाले आहे. वास्तू आकर्षक झाली आहे. त्यात आता प्रयोगाचे रंग लवकर भरले जावेत. – अशोक हांडे, ज्येष्ठ निर्माते आणि दिग्दर्शक**

**पहिल्या पाहणीच्या वेळी केलेल्या सूचनांची व्यवस्थित अमलबजावणी झाल्याचे पाहून चांगले वाटले. नुतनीकरणाचे काम योग्य पद्धतीने झाले आहे. ज्या काही एक-दोन गोष्टी होत्या त्याही आजच्या पाहणीनंतर पूर्ण करण्याचा शब्द महापालिकेने दिला आहे.– प्रसाद कांबळी, निर्माते**

**गडकरी रंगायतनला आज भेट दिल्यावर आनंद वाटला. नुतनीकरणासाठी थोडा वेळ लागला असला तरी ते काम चांगले झाले आहे. रंगमंचापासून ते आसनव्यवस्थेपर्यंत सगळ्या गोष्टी चांगल्या जुळून आल्या आहेत. – मंगेश देसाई, अभिनेते आणि निर्माते**

**ठाणे शहराची ओळख असलेली ही वास्तू चांगली होण्यासाठी उत्तम काम झाले आहे. सूचनांची अमलबजावणी झालेली आहे. या वास्तूचे वेगळेपण अधोरेखित करण्यासाठी मेहनत घेतलेल्या सर्वजणांचे मनापासून कौतुक आहे. – विजू माने, दिग्दर्शक आणि निर्माते**

# सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या बांटीया हायस्कूलला आयएसओ मानांकन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : शैक्षणिक क्षेत्रात तब्बल ४२ वर्ष ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या के .आ. बांठिया विद्यालयाला गुणवत्ता आणि मौलिक दर्जाचे शिक्षण देणारी शाळा म्हणून गौरविण्यात आले आहे. आय.एस.ओ नामांकनाचे प्रमाणपत्र प्रदान करण्याचा भव्य सोहळा नुकताच विद्यालयाच्या सभागृहात पार पडला. यामुळे सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या शिरपेच्यात प्रथमच एक गुणवत्तापूर्वक शाळा म्हणून मानाचा तुरा रोवण्यात आल्याने संस्थेच्या नावलौकिकात भरच पडली आहे.

सुधागड एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये यांनी १९८२ मध्ये अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून नवीन पनवेलच्या शेतकरी कामकरी, कष्टकरी ,माथाडी कामगार आणि बहुजन वर्गातील मुला मुलींना शिक्षण मिळावे यासाठी शाळा सुरू केली. या शाळेला त्यावेळी मोठी आर्थिक मदत पनवेल मधील बांठिया परिवाराने केली होती. त्यामुळेच संस्थेने के. आ. बांठिया माध्यमिक विद्यालय सुरू केले. विद्यालयाने शैक्षणिक स्तरांवरील सर्व उपक्रम, गुणवत्ता यामध्ये अग्रेसर असून शाळेच्या भौतिक सुविधा, शासनाचे विविध समाजपयोगी उपक्रम शासकीय धोरणांचा काटेकोरपणे केलेला अवलंब विद्यार्थ्यां प्रती असलेली शाळेची बांधिलकी, शासनाने ठरवून दिलेले शैक्षणिक नामांकनाचे निकष, गुणवत्ता व आदर्श या सर्वांचा मिलाफ विद्यालयाने आपल्या जडणघडणीत साधल्यामुळेच ISO मानांकन प्रमाणपत्राने शाळेला गौरविण्यात आले आहे.

यावेळी सु.ए.सो.पाली अध्यक्ष गीता पालरेचा, बांठिया शाळेचे ज्येष्ठ संचालक मोतीशेठ बांठिया, सर्व संचालक व कळंबोली विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे , गटशिक्षणाधिकारी सिताराम मोहिते , प्राचार्य भगवान माळी , प्राचार्य एस.सी. लहूपचांग, ISO चे हेड ऑफ डिपार्टमेंट महाराष्ट्र राज्य विजय नाडे , निवृत्त विद्यालय अधीक्षक प्रकाश जोशी, सर्व शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी , पालक माजी विद्यार्थी या सोहळ्याच्या प्रसंगी उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य माळी यांनी ISO मानांकन संदर्भात प्रास्ताविकेतून मानांकनाचे महत्त्व, त्यासाठी घेतलेले परिश्रम याबद्दल माहिती सांगितली . शाळा घेत असलेले शालेय उपक्रम, शालेय पोषण आहार, शालेय भौतिक सुविधा, कार्यालयीन कामकाज, सामाजिक कामे या सर्वांविषयी माहिती देऊन संस्था आणि शाळेतील मुख्याध्यापकापासून ते चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांपर्यंत तसेच विद्यार्थी, पालक, समाज बांधव या सर्वांचा या मानांकनात कसा मोलाचा सहभाग आहे याविषयी माहिती दिली.

ISO चे प्रमुख प्रतिनिधी विजय नाडे यांनी संस्थेच्या अध्यक्षा गीता पालरेचा व प्राचार्य भगवान माळी यांचेकडे ISO मानांकन प्रमाणपत्र प्रदान केले. यावेळी संस्थेचे बीज रोवणारे संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षी कै.दादासाहेब लिमये, संस्थेचे माजी अध्यक्ष स्वर्गीय वसंतशेठ ओसवाल यांचे स्मरण यावेळी करण्यात आले. संस्थेच्या शिरपेच्या प्रथमच आय एस ओ मानांकनाने शाळा गौरविण्यात आल्याने मोठ्या उत्साहात ISO मानांकन प्रमाणपत्र सोहळा साजरा करण्यात आला.

## बालासोरमधील आत्मदहन प्रकरण
# पोलीसांच्या अपयशाचे खापर पीडितेला वाचवणाऱ्या विद्यार्थ्यांवर फोडणे ; हा राजकीय डावपेच : अभाविप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओडिशाच्या बालासोर येथील महाविद्यालयीन विद्यार्थिनी व अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची कार्यकर्ती सौम्याश्री हिच्या आत्मदहनाच्या दुर्दैवी घटनेनंतर, तिच्या सोबत शिकणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना रात्री उशिरा अटक करून पोलिसांनी जी भूमिका घेतली आहे ती पूर्णतः पक्षपाती व चिंताजनक आहे. ही घटना म्हणजे एक नियोजित राजकीय कट कारस्थान आहे. वास्तविक दोषींवर कारवाई करण्याऐवजी, पीडितेला वाचवण्यासाठी धावून आलेल्या विद्यार्थ्यांनाच आरोपी ठरवणे हे अन्यायकारक आहे. विद्यार्थी परिषद या एकांगी व अन्यायकारक कृतीचा तीव्र निषेध करते.

या प्रकरणात संबंधित विभागप्रमुखाकडून पीडित विद्यार्थिनीवर अनैतिक दबाव टाकण्यात आला. या विरोधात तिने आवाज उठविल्यानंतर, सोशल मिडियावर तिचे सातत्याने मानसिक खच्चीकरण करण्यात आले. तिचा मानसिक संघर्ष सुरू असताना महाविद्यालयीन प्रशासन आणि पोलीस यांनी तिच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केले. तिच्यावर होणाऱ्या मानसिक, सामाजिक व संस्थात्मक दबावामुळे ती असहाय्य झाली व शेवटी आत्मदहनासारखा टोकाचा निर्णय तिने घेतला.

पोलिसांचा या प्रकरणातील निष्क्रिय व पूर्वग्रहदूषित दृष्टीकोन अत्यंत धक्कादायक आहे. सौम्याश्री ला अपमान, अन्याय आणि उपेक्षेला सामोरे जावे लागले, त्याविरोधात आवाज उठवणाऱ्या व तिला वाचवण्याचा प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांवरच पोलिसांनी कारवाई केली. हे कार्यकर्ते स्वतः जखमी होऊन हॉस्पिटलमधून नुकतेच डिस्चार्ज झाले होते, तरीही त्यांच्यावर खोटे आरोप लावून अटक केली गेली. हे संपूर्ण प्रकरण पोलीस दलाच्या पक्षपाती आणि राजकीय दबावाखाली काम करणाऱ्या यंत्रणेचे पितळ उघडे करत आहे. अभाविपचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. वीरेंद्र सिंह सोलंकी यांनी यावर प्रतिक्रिया देताना म्हटले, "हा प्रकार केवळ एका विद्यार्थिनीच्या आत्महत्येचा नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या अपयशाचा आरसा आहे. आम्ही या प्रकरणाची सखोल आणि स्वतंत्र चौकशी व्हावी अशी मागणी करतो. चौकशी केवळ आत्मदहनापुरती मर्यादित नसावी, तर त्या मानसिक, सामाजिक आणि संस्थात्मक दबावांपर्यंत जावी ज्यामुळे सौम्याश्रीला हा टोकाचा निर्णय घ्यावा लागला. संबंधित दोषींवर – ते कोणत्याही पदावर असोत किंवा कोणत्याही संघटनेशी संबंधित असोत – कठोर कारवाई व्हावी, अशी आमची स्पष्ट मागणी आहे.

प्रति गाणगापूर
प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे



तुमची कोणी निंदा करीत असेल तर खचू नका दुर्लक्ष करा. त्यावेळी तुम्ही असे माना की निंदकच तुमचे दोष तुम्हाला दाखवीत आहे. काही लोकांचा स्वभावच असा असतो की निंदा केल्याशिवाय त्यांचे पोटच भरत नाही. या जगाने कोणालाही सोडले नाही. सर्वांची निंदा केली. निंदा करणाऱ्यावर रागावू नका. असे समजा की, यातही देवाचा काही हेतू असेल. भगवंत म्हणतात, मानवाच्या कल्याणासाठी मनुष्य अवतार घेऊन मी या धरतीवर आलो तरीही लोकांनी माझी निंदाच केली. महापुरुष निंदेतही सारतत्व शोधतात.

गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज
मो.नं.7038727403/9890226862

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी अॅण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

## माध्यम क्षेत्रातून करिअरच्या संधी
# जीवनदीप महाविद्यालयाच्या वतीने लाईव्ह वेबिनार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली:आजच्या माध्यमाच्या युगात विद्यार्थ्यांना करिअरसाठी विविध वाटा उपलब्ध आहेत. माध्यम क्षेत्रात अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना खाजगी क्षेत्रात विविध संधी उपलब्ध आहेतच परंतु सरकारी विभागांमध्ये या विद्यार्थ्यांना कोणकोणत्या क्षेत्रात करिअर करता येऊ शकते, तसेच त्या ठिकाणी कशाप्रकारे आवेदन करावे, आपल्या कौशल्या मध्ये कशा प्रकारे वाढ करता येईल याबाबत विद्यार्थ्यांना माहिती व्हावी याकरता जीवनदीप महाविद्यालय गोवेली यांच्या मास मीडिया विभागांतर्गत



दिनांक ६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता प्रा. प्रमोद गायकवाड (IIMC अमरावती) यांचे विशेष फेसबुक लाईव्ह वेबिनार चे आयोजन करण्यात आले होते. या वेबिनारचा मास मीडिया विभागातील विद्यार्थ्यांनी एकत्रितरित्या मीडिया लॅब मध्ये तसेच ऑनलाईन पद्धतीने लाभ घेतला. विद्यार्थ्यांनी आपल्याला पडलेले प्रश्न प्रा. प्रमोद गायकवाड यांना विचारून त्यांचे निरसन करून घेतले. महाविद्यालयाचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे ,प्राचार्य. डॉ. अशोक वाघ , उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, संचालक. प्रशांत घोडविंदे ,मास मीडिया विभागप्रमुख डॉ. राहल तौर सहाय्यक प्राध्यापक मोहन गारे ,निलेश कुंभार व विद्यार्थी यांच्या हकार्याने सदर फेसबुक लाईव्ह वेबिनार उत्तम रीतीने संपन्न झाला.

## अनुगामी लोकराज्य महाभियान संस्थेच्या माध्यमातून
# मिरा भाईंदर येथे शासकीय योजनांचा जागर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : अनुगामी लोकराज्य महाभियान संस्थेच्या माध्यमातून अभिनव असा प्रयोग मिरा भाईंदर येथे करण्यात आला. अनुलोम ही संस्था संस्थेचे सभासद म्हणजे अनुलोम मित्रांच्या माध्यमातून सरकारी व लोकोपयोगी योजना ही समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे कार्य करते. सरकारी योजनांचा लाभ मिळविताना लाभ मिळवण्यासाठी येणाऱ्या अडचणी, शासकीय योजनांचा लाभ मिळविताना कागदपत्रे जमा करणे किंवा शेवटपर्यंत पाठपुरावा करणे किंवा लांबलचक प्रकिया याबाबतीत लाभार्थी यांची असलेली उदासीनता त्यांना लाभापासून दूर ठेवते, त्या पार्श्वभूमीवर अनुलोममित्र हे शासकीय यंत्रणा व लाभार्थी यांच्यात नोडल म्हणून कार्य करतात. या कार्यामुळे बऱ्याच लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळाला आहे. यशोगाथा निर्माण झाल्या आहेत.

अनुलोम मित्र म्हणून काम करताना त्यांना शासकीय अधिकाऱ्यांची बाजू समजून घेणे कार्यप्रणाली समजून घेऊन लाभार्थ्यांपर्यंत सकारात्मक प्रतिसाद देणे याकरिता हे मार्गदर्शन शिबिर आयोजित केले होते.

या शिबिरात नायब तहसिलदार (महसूल) प्रथमेश भुर्के यांनी महसूल विभागाची कार्यप्रणाली समजावून सांगितली व इतर योजनांची देखील सविस्तर माहिती दिली. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष समाजसेवा अधीक्षक पूजा माऊसकर यांनी वैद्यकीय योजनांची माहिती देऊन रुग्णांना कशाप्रकारे आर्थिक सहाय्य मिळते याबदल विस्तृत मार्गदर्शन केले. अण्णासाहेब पाटील महामंडळाचे ठाणे जिल्हा समन्वयक शुभम शिंदे यांनी व्यावसायिक होऊ इच्छिणाऱ्या तरुणांना शासनाकडून मिळणारा आर्थिक लाभ महामंडळाच्या माध्यमातून कशाप्रकारे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवला जातो याची माहिती दिली. महिला व बाल कल्याण अधिकारी चारुशीला खरपडे यांनी त्यांच्या विभागाच्या महिलांशी संबंधित कल्याणकारी योजनांची माहिती देऊन जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.

आरोग्य विभाग परिचारिका प्रियांका पालांडे यांनी आरोग्य विभागाच्या सर्व योजना सांगून योजनेच्या विस्ताराबद्दल सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमासाठी अनुलोमचे ठाणे उपविभाग जनसेवक रामनाथ म्हात्रे, मीरा भाईंदर जनसेविका स्नेहा तांदळे इ. मान्यवर उपस्थित होते.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN, printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.